तदा: 1500(जन-821/7.1.2000)-एमसी

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

# परिपत्रक

क्र. एमओएम/1653 दि.07.01.2000

विषय : सोमवार व शुक्रवार या दिवशी अधिका–यांनी नागरिकांना भेटण्यासाठी वेळ निश्चित करण्याबाबत.

महानगरपालिका आयुक्तांचे असे आदेश आहेत की सर्व उप आयुक्त, खाते प्रमुख व विभाग अधिकारी यांनी प्रत्येक आठवड्यातील सोमवार व शुक्रवार या दिवशी दुपारी 3 ते 5 ही वेळ नागरिकांना भेटण्यासाठी राखून ठेवावी. सदर वेळेत त्यांनी नागरिकांना आगाऊ भेटीची वेळ ठरविली नसली तरी भेटावे.

उपरोक्त दिवशी (नमूद केलेल्या वेळेमध्ये) आयुक्त,अतिरिक्त आयुक्त व उप आयुक्त कोणतीही बैठक शक्यतो आयोजित करणार नाहीत व सदर वेळेत ते देखील नागरिकांना पूर्वसंमतीविना भेटतील.

मात्र काही अपरिहार्य कारणास्तव आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांनी उपरोक्त दिवशी उप आयुक्त, खाते प्रमुख व विभाग अधिकारी यांना तातडीच्या बैठकीसाठी बोलाविल्यास संबंधितांनी आपल्या त्या दिवशीच्या नागरिकांसाठी उपलब्ध न राहण्याबाबतची नोटीस आपापल्या कक्षाबाहेर लावावी. मात्र खाते प्रमुख, विभाग अधिकारी यांनी अशा वेळी आपल्या निकटच्या निम्नतम अधिका–यांना नागरिकांना भेटण्यास उपस्थित राहण्यास सांगावे.

3. उपरोक्त सूचनांची नोंद घेऊन त्यांचे काटेकोरपणे पालन केले जावे.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/– 5.1.2000 | सही/–5.1.2000 | सही/– 5.1.2000 | सही/– 5.1.2000 |
| (दि.दा.देशपांडे) | (श.अं. महाड्दळकर) | (एस.वी.पाटील) | (अजित कुमार जैन) |
| रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्तांचे कार्यालय) | प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) |

सामान्य प्रशासन विभाग,
म.न.पा.आयुक्तांचे कार्यालय,
क्र.एमओएम/1653
दि.07.01.2000

सात्र/11
1999–2000

प्रत ---------------------------------------------------------------------यांना

( अधिक प्रतींसह) माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

[signature] 7/1/2000

रचना व कार्यपध्दती अधिकारी

## बृहन्मुंबई महानगरपालिका

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
दुसरा मजला, जुनी इमारत,
महानगरपालिका मार्ग,
मुंबई – 400 001
दूरध्वनी क्र.22754252

माहितीचा अधिकार

क्र. एमजीसी/एफ/3977
दिनांक: 21/08/2024

प्रति,
श्री.कमलाकर रत्नाकर शेनॉय
बी-903, वैशाली अपार्टमेंट,
एमटीएनएल एक्स्चेंजच्या समोर,
शेठ मोठिशा (लव) लेन, माझगांव,
मुंबई – 400010.
मो.नं.9870987359.

विषय – माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत
आपला दि.08.08.2024 रोजीचा अर्ज.
संदर्भ: क्र.एमआयआर/6429 दि.08.08.2024

महोदय,

आपला उपरोक्त अर्ज जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (आयुक्तांचे कार्यालय) यांजकडून ह्या कार्यालयात दि.12.08.2024 रोजी प्राप्त झाला.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 5(1)19(1) अन्वये जनतेला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने खातेस्तरावर/विभागस्तरावर जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी नियुक्त केलेले आहेत. त्यांची माहिती महानगरपालिकेच्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आपल्या उपरोक्त अर्जामधील नमूद विषयाच्या अनुषंगाने ह्या कार्यालयाशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकाऱ्याचे अभिप्राय |
|---|---|---|
| 9 | a) Confirmation required that circular dt.7.1.2000 is still in force and the same is not revoked and cancelled.<br>b) Confirmation that circular dt. 8.4.24 does not prevent any citizens from meeting the above public servants on working days. | नागरिकांना संबंधित अधिकारी / खाते प्रमुख यांना भेटण्याची वेळ निश्चितीकरिता रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय) सामान्य प्रशासन विभाग यांचेमार्फत क्र.एमओएम/1653 दि.07.01.2000 रोजी परिपत्रक वितरीत केले. सदर परिपत्रक स्वयंस्पष्ट आहे.<br>याव्यतिरिक्त मा. महानगरपालिका आयुक्त कार्यासनाकडून दि.08.04.2024 रोजी क्र.एमजीसी/ए/4937 अन्वये जनतेच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी वार व वेळ निश्चित करण्यात आल्याबाबत विद्यमान मा. महानगरपालिका आयुक्त यांनी सर्व संबंधितांना निर्देशित केले आहे. मा. महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशामध्ये दि.07.01.2000 रोजीचे परिपत्रक रद्द बातल केल्याचा उल्लेख दिसून येत नाही. |

**याद्वारे आपला माहिती अधिकारांतर्गत केलेला अर्ज या कार्यालयापुरता निकाली काढण्यात येत आहे.**

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास, व आपणास अपिल करावयाची ईच्छा असल्यास आपण अपिलीय अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण) यांच्याकडे खालील पत्यावर विहित कालावधीत अपिल करु शकता:-

**<u>अपिलीय अधिकारी:</u>**

श्रीम. सुजाता वारीक,
सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण), प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,
6 वा मजला, महापालिका विस्तारीत इमारत,
महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001.

आपला विश्वासू,

21/8/24

(आनंद सो. भवार)
**जन माहिती अधिकारी तथा**
**आयुक्तांचे स्वीय चिटणीस**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

माहितीचा अधिकार

श्रीम. सुजाता वारिक
सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण)
महापालिका आयुक्त यांचे कार्यालय,
महानगरपालिका मुख्यालय, नवीन इमारत,
महानगरपालिका मार्ग, मुंबई – 400 001
दुरध्वनी क्र.: 022-22754675
संकेत स्थळ: www.mcgm.gov.in
क्रमांक: एमजीसी/एफ/3304
दिनांक: 21/08/2024

प्रति,
**श्री.कमलाकर रत्नाकर शेनॉय**
बी-903, वैशाली अपार्टमेंट,
एमटीएनएल एक्स्चेंजच्या समोर,
शेठ मोतिशा (लव) लेन, माझगांव,
मुंबई – 400010.
मो.नं.9870987359.

**अपिल प्रकरणाशी संबंधित माहिती**

| | | |
|---|---|---|
| एक) | माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | दि. 29.04.2024 |
| दोन) | जन माहिती अधिकारी यांजकडे प्राप्त झालेल्या अर्जाचा दिनांक | दि.08.05.2024 |
| तीन) | जन माहिती अधिकाऱ्याने पाठविलेल्या उत्तराचा दिनांक | क्र.एमजीसी/एफ/3304 दि.10.05.2024 |
| चार) | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | - |
| पाच) | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक | अर्जदारास क्र.एमजीसी/एफ/3304 दि.10.05.2024 अन्वये पत्र पाठविण्यात आले आहे. |
| सहा) | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | दि.05.06.2024 रोजी प्रथम अपिल सादर केले. |
| सात) | प्रथम अपिल सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक | क्र.एमजीसी/एफ/3304 दि.22.07.2024 |
| आठ) | प्रथम अपिल सुनावणीचा दिनांक व वेळ | दि.14.08.2024 दुपारी 03.00 वा. |
| नऊ) | श्री.कमलाकर रत्नाकर शेनॉय, अपिलकर्ता | उपस्थित |
| दहा) | श्री. आनंद सो. भवार<br>जन माहिती अधिकारी तथा<br>मनपा आयुक्तांचे स्वीय चिटणीस | उपस्थित |

**माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने केलेल्या इतर पत्रव्यवहारासंबंधीची माहिती** - निरंक

**जन माहिती अधिकारी अथवा कलम 5(4) आणि 5(5) नुसार मानीव जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या उत्तराचा तपशिल:-**

सदर माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये सादर केलेल्या अर्जातील अनु. क्र.4 मधील VI, VII वगळता इतर बाबतीत आपणांस कळविण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये अर्जदार नागरिक इ. यांना अभिलेखात आहे त्याच स्थितीत जशास तशी उपलब्ध असलेली माहिती परिपत्रके, अभिलेख उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. तथापि, आपला मुद्दा क्र. VI, VII वगळता उपस्थित केलेल्या मुद्द्यानुसार आपणांस जनगा-हाणी दिन, लोकशाही दिन इत्यादीबाबत मनपा मार्फत निर्गमित केलेल्या परिपत्रकानुषंगाने संबंधित खाते / उप आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तथापि, मनपा आयुक्त यांनी नागरिकांच्या समस्यांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने दर सोमवारी व शुक्रवारी नागरिकांना भेटण्यासंबंधी दि. 08.04.2024 रोजीचे महानगरपालिका आयुक्त कार्यासनाकडून क्र. एमजीसी/ए/4937 अन्वयेचे सूचना वजा आदेश सर्व अतिरिक्त आयुक्त / परिमंडळीय उप आयुक्त व सर्व विभागीय सहाय्यक आयुक्त हयांना निर्गमित करण्यात आले आहेत. सदर सूचना वजा आदेश स्वयंस्पष्ट असून त्याची अंमलबजावणी सर्व संबंधितांकडून होणे अपेक्षित आहे.

## विवेचन

अर्जदार, श्री.कमलाकर रत्नाकर शेनॉय यांनी माहिती अधिकार अर्जान्वये मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नाही म्हणून ते समाधानी नसल्याने, प्रथम अपिल अर्ज सह प्रमुख कर्मचारी अधिकारी(सर्वसाधारण) यांच्या कार्यालयात दि.05.06.2024 रोजी सादर केला आहे.

अपिलकर्ता, श्री.कमलाकर रत्नाकर शेनॉय व जन माहिती अधिकारी तथा आयुक्तांचे स्वीय चिटणीस हे दि.14.08.2024 रोजी दुपारी 3.00 वा. सुनावणीसाठी उपस्थित होते.

अर्जदार श्री.कमलाकर रत्नाकर शेनॉय यांच्या माहिती अधिकार अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा मनपा आयुक्तांचे स्वीय चिटणीस यांनी यापूर्वीच उत्तर दिलेले असून त्यांनी सुनावणी दरम्यान असे प्रतिपादन केले की, दि.07.01.2000 चे परिपत्रक व दि.08.04.2024 रोजीचे विद्यमान मा. आयुक्तांचे आदेश / निर्देश याबाबत संदिग्धता दिसून येते. दि. 07.01.2000 रोजीचे परिपत्रक व दि. 08.04.2024 रोजी आयुक्त कार्यासनाकडून निर्गमित केलेले सूचना वजा आदेश हे स्वतंत्र असून त्याची सर्व संबंधीतांनी अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. यावर अपिलकर्ता यांनी दि.07.01.2000 च्या परिपत्रकाप्रमाणे काही कार्यालयांमध्ये नागरिकांना भेटणेबाबत कार्यवाही होत नसल्याचे सांगून सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सामान्य नागरिकांना भेटीबाबत सर्व संबंधीत अधिका-यांनी कार्यवाही करणे अपेक्षित असल्याचे सांगितले.

## आदेश

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा आयुक्तांचे स्वीय चिटणीस यांनी विहित कालावधीमध्ये अर्जदारास उत्तर दिले असून ते योग्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अभिलेखात उपलब्ध आहे व माहिती अर्जदारास दिली नाही अशी वस्तुस्थिती नाही. नागरिकांच्या तक्रारींचे निरसन होण्याच्या दृष्टीने वेळोवेळी तत्कालीन मा. आयुक्तांनी स्वाधिकारात दिलेले आदेश / निर्देश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच, आयुक्तांच्या कार्यासनाकडून निर्गमित दि.08.04.2024 रोजीचे विद्यमान मा. आयुक्तांचे निर्देश असून परिपत्रक नाही. दि.07.01.2000 रोजीचे प्रशासनाचे परिपत्रक रद्दबातल करणे अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल दि.08.04.2024 रोजीच्या निर्देशामध्ये सूचविण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे दि. 07.01.2000 रोजीचे परिपत्रक तसेच दि. 08.04.2024 रोजीचे आयुक्त कार्यासनाकडून दिलेल्या आदेशान्वये संबंधीतांनी विहित कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

तद्वत सदर अपिल या कार्यालयापुरते निकाली काढण्यात येत आहे.

तरीही वरील आदेशाने अपिलकर्त्याचे समाधान झाले नसल्यास, ते ९० दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल सादर करु शकतात. त्यांचा पत्ता खालीलप्रमाणे आहे:-

राज्य मुख्य माहिती आयुक्त,<br>
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन,<br>
मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई – ४०० ०३२.

सुवारिक 29-8-2024

श्रीम. सुजाता वारिक<br>
अपिलीय अधिकारी तथा<br>
सहप्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण)

दिनांक:- 21 /08/2024.<br>
ठिकाण:- मुंबई